| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कारखान्यात जे शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेतात, त्यांना प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या विहित दराने प्रतिमहा विद्यावेतन देण्यांत येते. त्याचा दर खालीलप्रमाणे आहे. (रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना जी.एस. आर. ६८० (अ), दिनांक २२ सप्टेंबर २०१४)<br><br>प्रथम वर्ष - संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल कामगारांच्या किमान मजुरीच्या ७० टक्के<br><br>द्वितीय वर्ष - संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल कामगारांच्या किमान मजुरीच्या ८० टक्के<br><br>तृतिय वर्ष - संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल कामगारांच्या किमान मजुरीच्या ९० टक्के<br><br>चतुर्थ वर्ष - संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल कामगारांच्या किमान मजुरीच्या ९० टक्के<br>केंद्र शासनाने ऑगस्ट २०१६ पासून शिकाऊ उमेदवारी योजनेकरीता Apprenticeship Training Portal www.apprenticeship.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिया सुरु केलेली आहे. या पोर्टलवर शिकाऊ उमेदवार तसेच आस्थापना नोंदणी करु शकतात. शिकाऊ उमेदवारांची भरती वर्षातून केव्हाही करता येते. परंतू शिकाऊ उमेदवारीचा कालावधी संपताच येणाऱ्या परीक्षेस उमेदवार बसू शकतो. तसेच परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतली जाते.<br><br>केंद्र शासनाने सुरु केलेल्या Apprenticeship Training Portal (www.apprenticeship.gov.in) वर ३१ डिसेंबर,२०१८ अखेरपर्यंत ७६७५ आस्थापनांची नोंदणी झालेली आहे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) :**<br>शिकाऊ उमेदवारांच्या भरतीकरीता आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक १९/०८/२०१६ पासून शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना **(NAPS)** खालीलप्रमाणे सुरु करण्यांत आली.<br>• या योजने अंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी आस्थापनांना दिनांक १९/०८/२०१६ पासून शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेतंर्गत (एन.ए.पी.एस.) दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या २५% किंवा रु.१५००/- यापैकी कमी असलेली रक्कम आस्थापनेला देय असेल.<br>• या योजने अंतर्गत फ्रेशर शिकाऊ उमेदवारांना मुलभूत प्रशिक्षण कालावधीत ही रक्कम देय नाही. फ्रेशर शिकाऊ उमेदवारांकरिता ५०% मुलभूत प्रशिक्षणाची रक्कम (रु.७५००/- जास्तीत जास्त) ५०० तास / ३ महिने एवढी देय राहील.<br>शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेतंर्गत (एन.ए.पी.एस.) डिसेंबर २०१८ अखेरपर्यंत ५०२३ आस्थापनांना रु.२,७४,१४,०३५/- एवढ्या रकमेचे वाटप करण्यांत आलेले आहे. | | | |
| १८ | हायटेक प्रशिक्षण योजना<br>प्रगत तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कारखान्यातील उत्पादन प्रक्रियामध्ये संख्यात्मक व गुणात्मक बदल घडविण्यासाठी नवीन पिढीतील कुशल कामगारांना अद्ययावत व उच्च व तंत्रज्ञाचे प्रशिक्षण देवून तांत्रिक दृष्टया कार्यक्षम करणे. सदर योजना फक्त औ.प्र.संस्था, औध, पुणे येथे कार्यरत आहे. | योजना राबविण्याचे (जनतेला सेवा देण्याचे ) सविस्तर वेळापत्रक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य ठरवितात व ते वेळोवेळी प्रकाशित केले जाते. | सहा.प्रशि.सल्लागार (तां)<br>(चौथा मजला)<br>(नवीन इमारत)<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारित क्रमांक १००३/१२०१/१२०३<br>तसेच संबधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मजला)<br>(चौथा मजला)<br>(नविन इमारत)<br>दुरध्वनी क्रमांक २६२२०६०३/ ६०४<br>विस्तारीत क्रमांक ४००१. |

